## म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र.२५/ २०२२

### निशाणी क्र. २५ खालील आदेश

**०१.** प्रस्तुतचा विचाराधीन अर्ज हा सामनेवाला यांनी तो जेव्हा केव्हा गावी जाईल तेव्हा मुलगा मानस याला भेटण्याची परवानगी मिळण्याकरीता सादर केला आहे. सामनेवालाचे असे म्हणणे आहे की, त्याला मुलगा मानस याच्याशी भेटू दिले जात नाही.

**०२.** अर्जदार यांनी निशाणी २६ कडे आपले म्हणणे देवून अर्जाला विरोध दर्शविला. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, ऑक्टोबर २०२० पासून दि.०५.०६.२०२३ रोजी पोटगीचा आदेश होईपर्यंत सामनेवाला याला मुलाबाबत प्रेम नव्हते व पोटगीचा आदेश पारीत झाल्यानंतर मुलाप्रती त्याचे प्रेम अचानक जागे झाले. मुलाचे जन्मापासून सामनेवाला याने मुलाला कधीही विचारले नाही किंवा प्रेमाने जवळ घेतले नाही तसेच त्याच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी व शिक्षणासाठी कोणतीही तजवीज केली नाही. सामनेवाला याला पोटगी द्यावी लागेल म्हणून मुलाप्रती खोटे प्रेम असल्याचे दाखवित सदरचा खोटा अर्ज केला आहे. अर्जदार ही मुलाची सर्व ती काळजी घेत आहे. मुलगा आता सात वर्षाचा असून तो एल.टी.टी.इंग्लीश मिडीयम स्कूल खेड येथे इयत्ता दुसरीमध्ये शिकत आहे. त्याच्या बालमनावर व शिक्षणावर विपरीत परिणाम होवू नये याकरीता सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

**०३.** सदर अर्जाच्या अनुषंगाने दोन्ही पक्षाकडून युक्तिवाद करण्यात आला.

**०४.** सामनेवाला याने गावी आल्यावर मुलगा मानस याला भेटण्याची परवानगी मागितलेली आहे. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियमांतर्गत अशा प्रकारचा दिलासा सामनेवाला यांना देण्याबाबत अशी कोणतीही तरतूद नाही. अर्जदाराने प्रस्तुत अर्जावर जे म्हणणे दिले त्यावरुन मुलगा मानसचे वय पाच वर्षापेक्षा जास्त आहे हे दिसून येते. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम मध्ये केवळ व्यथित व्यक्ति म्हणजेच अर्जदाराला वेगवेगळे दिलासा तसेच अपत्याचा तात्पुरता ताबा मंजूर करता येते. सदर कायद्यामध्ये सामनेवाला याला कोणत्याही प्रकारचा दिलासा मंजूर करण्याची तरतूद नाही. परंतु त्याला अपत्याला भेटण्याची परवानगी देता येते. असे असले तरी सामनेवाला हे मुलाशी भेटल्यानंतर मुलाच्या मनामध्ये अर्जदाराविषयी कटुता निर्माण

करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सामनेवाला याने मुलाला भेटण्याची निश्चित दिवस, वेळ अर्जामध्ये नमुद केलेले नाही. सबब, सदरचा अर्ज हा मंजूर करता येणार नाही. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज (निशाणी २५) फेटाळण्यात येतो.

CHAVAN SANJAY MOTIRAM
Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2025.01.23 10:43:22 +0530

**(सं. मो. चव्हाण)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड**
**ता. खेड, जि. रत्नागिरी.**

**दिनांक – २१.०१.२०२५**

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | P.W.D.V.A. No.25/2022 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Smt. S. J. Salunkhe |
| Court Name | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Court, Khed. |
| Date of Decision | : | 21.01.2025 |
| Judgment/Order signed by Presiding Officer on | : | 21.01.2025 |
| Judgment/Order uploaded on | : | 23.01.2025 |